**ठळक बातम्या**

- शासनाच्या सर्व सेवा येत्या १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचे निर्देश
- एसटी महामंडळाच्या आर्थिक परिस्थितीची श्वेत पत्रिका काढण्याचे परिवहन मंत्र्यांचे आदेश
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध मान्यवरांचा पद्म पुरस्कारानं गौरव

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स १ हजारांनी वधारुन ८० हजार अंकांच्या वर

**<><><><><>**

शासनाच्या सर्व सेवा येत्या १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत, ते आज मुंबईत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीची 'दशकपूर्ती' आणि 'प्रथम सेवा हक्क' दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात बोलत होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत. शासनाच्या ज्या विभागाच्या सेवा १५ ऑगस्टपर्यंत त्यांच्या ऑनलाईन होणार नाहीत, त्या विभागाला दररोज प्रत्येक सेवेसाठी एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल, असं त्यांनी सांगितलं. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, तसंच वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसंच भविष्यातल्या नियोजनासाठी एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. ते आज एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये बोलत होते.
सुमारे १० हजार कोटी रुपये संचित तोटा सहन करणाऱ्या एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळतं? किती खर्च येतो? किती देणी बाकी आहेत, या सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी श्वेतपत्रिका काढून त्यातून एक आर्थिक शिस्त निर्माण करणं गरजेचं आहे, असं सरनाईक म्हणाले.
सर्व कर्मचाऱ्यांना एकाच छताखाली वैद्यकीय सेवा सुविधा आणि वैद्यकीय चाचण्या करून मिळतील अशी वैद्यकीय वीमा योजना धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावानं सुरू करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. एसटी प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्याकरता एसटी महामंडळाच्या अधिकारी आणि प्रशासनाला मार्गदर्शन करण्यासाठी विविध क्षेत्रातल्या ५ तज्ञांची नियुक्ती करण्याच्या सूचना सरनाईक यांनी या बैठकीत दिल्या. १ हजार ३१० बसगाड्या भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रकरणाची चौकशी तटस्थ व्यक्ती मार्फत केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातली पर्यटन स्थळं, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरवणं हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असेल. सातारा इथं १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या महाबळेश्वर

महोत्सवात पर्यटन सुरक्षा दलाचा पहिल्यांदा प्रयोग केला जाणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.

<><><><><>

देशाची मत्स्योत्पादन निर्यात दुप्पट करायचं ध्येय सरकारनं ठेवलं आहे. त्यासाठी मत्स्य उत्पादनात मूल्यवर्धन करणं आणि पायाभूत सुविधा बळकट करणं अतिशय गरजेचं असल्याचं मत केंद्रीय मत्स्यव्यवसाय आणि पशुपालन मंत्री राजीव रंजन सिंह यांनी आज मांडलं. सध्या ही निर्यात ६० हजार ५२४ कोटी रुपये इतकी आहे. अमेरिकेनं अतिरीक्त आयात शुल्क लादल्यानं आणखी अनेक देशांमध्ये भारताला निर्यातीची संधी उपलब्ध झाली आहे, असं ते म्हणाले. ते आज मुंबईत किनारपट्टीवरच्या राज्यांच्या परिषदेत बोलत होते.

मत्स्योत्पादनात पहिला क्रमांक मिळवण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. त्यासाठी राज्य सरकारनं प्रयत्न करावे, असं आवाहन त्यांनी केलं. मच्छिमारांना घर देण्यासाठी केंद्र सरकारनं चांगली योजना सुरू करावी, अशी मागणी राज्याचे मस्त्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी केली.

<><><><><>

मुंबईत येत्या १ मे पासून ४ मे पर्यंत आयोजित वेव्हज, अर्थात जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेचं उद्धाटन १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांमधले परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. हिंदी, मराठी, तामीळ चित्रपटसृष्टीतले अनेक दिग्गज कलाकार आणि निर्माते कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं. हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राला जागतिक

स्तरावर नेण्याची संधी आहे. त्साठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे, असे आवाहनही उदय सामंत यांनी केलं. जगभरातले अनेक मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…

**होल्ड - मुख्यमंत्री**

**<><><><>**

वेव्हज दरम्यान आयोजित केलेल्या विविध स्पर्धांची अंतिम फेरीही याचवेळी होणार आहे. ॲनिमेशन, VFX, ऑगमेंटेड रियालिटी, व्हर्चुअल रियालिटी अशा विविध विभागांमधून ४२ स्पर्धक निवडले गेले आहेत. यात १२ फिचर फिल्म, १८ लघुपट, ९ टीव्ही मालिका तसंच ३ अन्य प्रकारच्या आशय प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्वांचं सादरीकरण या परिषदेत होणार आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या तेजस जनार्दन या स्पर्धकानं सांगितलं..

**होल्ड बाईट - तेजस जनार्दन**

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी सरकारनं १३९ जणांना पद्म पुरस्कार जाहीर केले होते. त्यामध्ये ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. प्रख्यात व्हायोलिनवादक डॉक्टर एल सुब्रमण्यम, डॉ दुव्वूर नागेश्वर रेड्डी यांना पद्मविभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं. प्रसारभारतीचे माजी अध्यक्ष आणि ख्यातनाम संपादक ए सूर्यप्रकाश, चित्रपट अभिनेते नंदमुरी बालकृष्ण, अजित कुमार, हॉकीपटू श्रीजेश यांना पद्मभूषण पुरस्कार देण्यात आला. राज्यातल्या मारुती चितमपल्ली, वासुदेव कामत, चैतराम पवार यांच्यासह पवनकुमार गोयंका, क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन, शालीनीदेवी होळकर, अरुंधती भट्टाचार्य, पंडित रोनू मुजुमदार, जसपिंदर

नरुला कौर, महामहीम शेखा अल सबाह, लिबिया लोबो सरदेसाई यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार तेजी नोंदवली आणि शुक्रवारी झालेल्या घसरणीनं झालेलं नुकसान भरुन काढलं. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६ अंकांनी वाढून ८० हजार २१८ अंकांवर बंद झाला. निफ्टी २८९ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ३२९ अंकांवर बंद झाला. बँका, धातू, वाहन, आरोग्य क्षेत्रातल्या समभागात मोठी वाढ झाली.

सोनं आज तोळ्यामागे ५०० रुपयांनी स्वस्त झालं आणि २४ कॅरेट सोनं ९८ हजार रुपयाला एक तोळा मिळत होतं. चांदी साडे बाराशे रुपयांनी स्वस्त झाली आणि ९९ हजार रुपयांपेक्षा महाग मिळत होती.

**<><><><>**

मुंबईतल्या २६/११ हल्ल्याच्या कटात सामील असलेल्या तहव्वुर हुसेन राणाला राष्ट्रीय तपास संस्थेने आज विशेष न्यायालयासमोर हजर करून वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्यानुसार न्यायालयाने अजून १२ दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली आहे. राणा गेले १८ दिवस राष्ट्रीय तपास संस्थेच्या ताब्यात होता आणि त्यादरम्यान मुंबई पोलिसांनीही त्याची चौकशी केली होती. चौकशीदरम्यान राणाने सहकार्य केलं नाही तसंच उडवाउडवीची उत्तरं दिल्याचं पोलिसांनी म्हटलं होतं .

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

विदर्भात आज वादळी वाऱ्यांसह विजेच्या कडकडाटाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली असून उद्यापर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. गडचिरोली जिल्ह्यात मात्र ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. गडचिरोलीत मेघगर्जनेसह पावसाला सुरूवात झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

//<><><><><>//